**नवी पहाट**



सरत्या दिसाची तिरपी किरणे
उन्हें जाहली सौम्य क्षमाशील
मावळतीची मुग्ध पश्चिमा
देती रातीची वत्सल चाहूल

मंद झाल्या दिशांच्या पाकळ्या
मिटू लागले दिवसाचे फूल
अलगद उतरे रजनी राणी
क्षणभर झाला निसर्ग निश्चल

निरोप घेऊन चराचराचा
दिनकर जाई मग अस्ताचल
विश्वासाने विलीन होई
कुशीत निशेच्या सायंकाल

काळरात्रीचा अंधार सरूनी
उगवेल नवस्वप्न ते उज्वल
नवतेजाने उजळून जाईल
नववर्षाचा हा उषःकाल!

**शीतल पाटकर**